CIDCO
WE MAKE CITIES

लोकसत्ता मुंबई, गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५

# पसंतीप्रमाणे घर न मिळालेल्या अर्जदारांना शुल्काविना अर्जसंधी

## १,८८१ अर्जदारांना सिडकोकडून पुढील सोडतीत विशेष पर्याय

लोकसत्ता प्रतिनिधी



**नवी मुंबई :** शिवजयंतीच्या मुहूर्तावर बुधवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडकोचे घर' योजनेची सोडत जाहीर करण्यात आली. या सोडतीमध्ये ज्या १,८८१ अर्जदारांना त्यांच्या पसंतीप्रमाणे घरे मिळाली नाही, अशांसाठी सिडकोने यापुढील सोडतीमध्ये संबंधित अर्जदार अर्जशुल्क न भरता सहभागी होऊ शकतील असा पर्याय उपलब्ध ठेवला आहे. या अर्जदारांना नव्या सोडतीत सहभागी होण्यासाठी नव्याने अर्ज करण्याची तसेच शुल्क भरण्याची गरज भासणार नाही असे सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या चार महिन्यांपासून २५,७२३ घरांची सोडत प्रक्रिया सिडको (पान ३वर)

## पसंतीनुसार घर न लागलेल्या अर्जदारांना संधी

(पान १वरून) महामंडळाने राबविली. १९,५१८ अर्जदारांना सोडतीमध्ये घर लागल्याचे सिडकोने जाहीर केले. शेकडो अर्जदारांना त्यांच्या निवडीप्रमाणे सिडकोचे पसंतीचे घर मिळाल्याने अर्जदारांनी आनंद व्यक्त केला. यातील पहिल्या फेरीत १२,४२० अर्जदारांना, दुसऱ्या फेरीत ६१३ आणि तिसऱ्या फेरीमध्ये ४०४ अर्जदारांना त्यांनी निवडलेल्या पर्यायाप्रमाणे घरे लागली. सोडतीची चौथी फेरी सिडको ऑनलाइन पद्धतीने काढणार होती. याच चौथ्या फेरीत तब्बल ६,०८१ अर्जदारांना ऑनलाइन प्रणालीने घरे लागली.

ज्या अर्जदाराना घरे लागली नाहीत, अशांना पुन्हा नवीन सोडत जाहीर झाल्यावर सोडतीत सहभाग घ्यायचा असल्यास त्यांनी अर्जासोबत भरलेले अडीचशे रुपये अर्ज शुल्क सिडकोकडे तसेच कायम असल्याने नव्या सोडत प्रक्रियेत त्यांना अर्जशुल्क भरावे लागणार नाही.

**- शान्तनू गोयल,** सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIDCO
WE MAKE CITIES

**लोकमत** गुरुवार, दि. २० फेब्रुवारी २०२५

# २१,३९९ जणांना मिळाले पसंतीचे सिडकोचे घर; मान्यवरांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पनवेल :** सिडकोतर्फे बुधवारी २६ हजार घरांची ऑनलाइन सोडत काढण्यात आली. त्यात २१ हजार ३९९ जणांना त्यांच्या पसंतीचे घर मिळाले. सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी लॉटरी आहे. सिडकोची ही घरे टाटा, एल अँड टी, शापूरजी यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती दर्जेदार असून घरे रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने फायदा होणार आहे.

मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे ही ऑनलाइन सोडत काढण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, 'सिडको'चे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख उपस्थित होते.

## वेळेत मोठी बचत होणार

अटल सेतूमुळे मुंबई-नवी मुंबई प्रवास २० मिनिटांत पूर्ण होतो. आता ठाणे ते विमानतळ एक डेडिकेटेड कॉरिडॉर करण्यात येणार असून, त्याचबरोबर मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे.

## फ्लेमिंगोंची संख्या वाढली

एमटीएचएल प्रकल्पाला काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र त्यावेळी रिमुव्हर्स सर्कुलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानांचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोंची संख्या कमी न होता वाढली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

महाराष्ट्र टाइम्स। मुंबई | गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५

# नवे गृहनिर्माण धोरण लवकरच

**म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई**

'राज्यात लवकरच नवीन गृहनिर्माण धोरण आणले जात असून यात सर्वांसाठी परवडणारी घरे, परवडणारी भाड्याची घरे, विद्यार्थी वसतिगृहे, तसेच काम करणाऱ्या महिलांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी, गिरणी कामगार व डबेवाले आदींकरीता घरे बांधली जाणार आहेत', अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिली. येत्या काळात महाराष्ट्रात २० ते २५ लाख घरे उभारली जाणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाइन सोडत काढण्यात आली. या प्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व अन्य अधिकारी उपस्थित होते. या लॉटरीद्वारे १९,५१८ अर्जदारांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत. त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहेत. सिडकोच्या २१,३९९ सदनिकांच्या महासोडतीच्या माध्यमातून एकूण १९,५१८ नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असल्याची भावना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली.

मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना भविष्यात मुंबईत परत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहेत. त्याचबरोबर सिडको, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, महाप्रित, बीएमसी, म्हाडा, एसआरए या सर्व संस्थांना एकत्र करून रखडलेले प्रकल्प लवकर सुरू करण्यात येत असल्याचेही शिंदे यांनी जाहीर केले. समूहविकास माध्यमातून सर्वांना खुली जागा, खेळाची मैदाने, शाळा, वैद्यकीय सुविधा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती



- 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाइन सोडत जाहीर
- १९,५१८ नागरिकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण
- येत्या काळात राज्यात २० ते २५ लाख घरांची उभारणी

CIDCO
WE MAKE CITIES

नवशक्ति
marathi.freepressjournal.in मुंबई, गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीदिनी २१,३९९ सदनिकांची महासोडत

# 'सिडको'चे १९,५१८ जणांना मिळाले 'पसंतीचे घर'

**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीदिनी २१,३९९ सदनिकांच्या महासोडतीच्या माध्यमातून एकूण १९,५१८ नागरिकांचे सिडकोचे 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या योजनेद्वारे शासनाने स्वप्न पूर्ण केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाईन सोडत काढण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



> सिडकोची गृहनिर्माण योजना हे प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकारणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे. यशस्वी अर्जदारांना माझ्या शुभेच्छा आहेत. नवी मुंबई हे भविष्यातील विकासाचे केंद्र असून सिडकोच्या योजनेमुळे सर्वसामान्य कुटुंबांना नवी मुंबईमध्ये हक्काचे घर मिळाले आहे.
>
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत, त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाले. हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असून त्यांच्या अभिनंदनाची भावना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. एका क्लिकद्वारे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते १९,५१८ अर्जदारांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महासोडत कार्यक्रमासाठी दिलेल्या संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. उपमुख्यमंत्री यांनी संदेशामध्ये, सदर महासोडत प्रक्रिया हे "सर्वांसाठी घरे" या संकल्पपूर्तीच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे, असे प्रतिपादन केले व यशस्वी अर्जदारांना शुभेच्छा दिल्या. अनेक सर्वसामान्य कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होणे हा आनंदाचा क्षण असल्याचे मतदेखील उपमुख्यमंत्री यांनी व्यक्त केले.

CIDCO
WE MAKE CITIES

पुढारी महामुंबई मुंबई, गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५

# १९,५१८ जणांना मिळाले सिडकोचे घर

## सिडकोची सर्वांत मोठी सोडत; रखडलेले प्रकल्प मार्गी लावणार : उपमुख्यमंत्री शिंदे

**नवी मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

सिडकोच्या बहुप्रतीक्षित असलेल्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या योजनेतील २१,३९९ सदनिकांची ऑनलाईन महासोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे बुधवारी काढण्यात आली. यामध्ये एकूण १९,५१८ नागरिकांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले. आजच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी सिडकोची घरे मिळालेले हे सर्वजण भाग्यशाली असल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केली. तसेच रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लावणार असल्याची घोषणा केली.

या कार्यक्रम प्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओद्वारे दिलेला संदेश दाखविण्यात आला. या संदेशात मुख्यमंत्र्यांनी सिडकोची गृहनिर्माण योजना हे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकारणारे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले व यशस्वी अर्जदारांना शुभेच्छा दिल्या.

तसेच नवी मुंबई हे भविष्यातील विकासाचे केंद्र असून सिडकोच्या योजनेमुळे सर्वसामान्य कुटुंबांना नवी मुंबईमध्ये हक्काचे घर मिळाले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले तर अनेक सर्वसामान्य कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होणे, हा आनंदाचा क्षण असल्याचे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या संदेशाद्वारे व्यक्त केले.




**नवी मुंबईः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या योजनेतील ऑनलाईन महासोडत काढण्यात आली. यावेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे आदी उपस्थित होते. यावेळी सोडतीत भाग घेतलेल्या नागरिकांनी गर्दी केली होती.**

**• मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना मुंबईत परत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहेत. त्याचबरोबर सिडको, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, महाप्रित, बीएमसी, म्हाडा, एसआरए या सर्व संस्थांना एकत्र करून रखडलेले प्रकल्प लवकर सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी जाहीर केले. समूह विकास माध्यमातून सर्वांना खुली जागा, खेळाची मैदाने, शाळा, वैद्यकीय सुविधा मिळणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.**

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वांत मोठी लॉटरी असून यात नागरिकांना आपली पसंती नोंदविण्याची मुभा सिडकोने दिली आहे. सिडकोची ही घरे टाटा, एल. एण्ड टी., शापूरजी पालनजी यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती अतिशय दर्जेदार असून ही घरे रेल्वे स्थानक, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार आहे. नवी मुंबईचे अतिशय वेगाने शहरीकरण होत असल्याने घरांची मागणी वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

पूर्वी नवी मुंबईतून मुंबईत येण्यासाठी एक ते दीड तास लागत असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, आता अटलसेतूमुळे २० मिनिटात प्रवास होतो. आता ठाणे ते विमानतळ एक डेडीकेटेड कॉरिडोर करण्यात येणार असून त्याचबरोबर मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या अर्थसंकल्पात देशात तीन कोटी घरे देण्याचे जाहीर केले असल्याने महाराष्ट्रात २० ते २५ लाख घरे नक्की बांधली जातील असे यावेळी शिंदे म्हणाले.

एमटीएचएल प्रकल्पाबाबत बोलतांना शिंदे म्हणाले की, काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी या प्रकल्पास विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र त्यावेळी रिमुव्हर्स सर्कुलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानांचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या कमी न होता आणखी वाढली. आता नवीन गृहनिर्माण धोरणे आणली जात असून यात सर्वांसाठी परवडणारी घरे, परवडणारी भाड्याची घरे, विद्यार्थी वसतिगृहे, काम करणाऱ्या महिलांसाठी घरे, ज्येष्ठ नागरिकांना घरे, गिरणी कामगार, डबेवाले आदींचा यात अंतर्भाव असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले.

CIDCO
WE MAKE CITIES

**आपलं महानगर** मुंबई : गुरुवार २० फेब्रुवारी २०२५

# सिडकोच्या घरांची १९,५१८ जणांना लॉटरी

## घर मिळालेल्यांचे एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिनंदन

**प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा**

**नवी मुंबई : सिडकोची बहुचर्चित 'माझ्या पसंतीचे सिडको घर' योजनेची शिवजयंतीचे औचित्य साधून बुधवारी (१९ फेब्रुवारी) लॉटरी काढण्यात आली. यात १९ हजार ५१८ कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. सिडकोने २१ हजार ३९९ सदनिकांची ऑनलाईन महासोडत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत काढली. यावेळी हक्काचे घर मिळालेल्याचे एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केले. तसेच सर्वांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळून त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत असल्याचे कौतुकाने सांगितले.**



या महासोडतीच्या कार्यक्रमासाठी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा व्हिडीओच्या माध्यमातून अर्जदारांना दिलेल्या शुभेच्छांचा संदेश दाखवण्यात आला. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले.

सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी लॉटरी असून यात नागरिकांना पसंद नोंदवण्याची मुभा फक्त सिडकोने दिली होती, याकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवर्जून लक्ष वेधले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घरे देण्याची घोषणा केली असून हा विक्रम आहे. सिडकोची ही घरे टाटा, एल एण्ड टी, शापूरजी यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती दर्जेदार असून घरे रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

CIDCO
WE MAKE CITIES

पुण्य नगरी www.epunyanagari.com | गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ | मुंबई

# सर्वांच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे प्रतिपादन; 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाइन सोडत संपन्न

**मुंबई :** सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत, त्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यांसारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहेत. आजच्या या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी २१ हजार ३९९ नागरिकांना सिडकोचे 'माझ्या पसंतीचे सिडको घर' याद्वारे हे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असून त्यांच्या अभिनंदनाची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाइन सोडत काढण्यात आली. यावेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, सिडकोचे अधिकारी तसेच लॉटरीत सहभागी झालेले नागरिक उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वांत मोठी लॉटरी असून यात नागरिकांना आपली पसंद नोंदवण्याची मुभा फक्त सिडकोने दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घरे देण्याची घोषणा केली असून ऐवढ्या मोठ्या प्रमाणात घरे देण्याचा विक्रम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सिडकोची ही घरे टाटा, ▶▶ पान ९ वर...



### एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या वाढली

एमटीएचएल प्रकल्पाबाबत बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी या प्रकल्पास विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र, त्यावेळी रिमूव्हर्स सर्क्युलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानांचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या कमी न होता आणखी वाढली. यावरून हे शासन प्रो एन्व्हॉयर्नमेंट प्रकल्प करत आहे, हे दिसून आले.

# सर्वांच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे!

(पान १ वरून) एल एण्ड टी, शापूरजी यांच्या सहभागाने बांधल्याने ती अतिशय दर्जेदार असून ही घरे रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार आहे. नवी मुंबईचे अतिशय वेगाने शहरीकरण होत असल्याने घरांची मागणी वाढल्याचे त्यांनी सांगितले.

पूर्वी नवी मुंबईतून मुंबईत येण्यासाठी एक ते दीड तास लागायचे, असे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, आता अटलसेतूमुळे २० मिनिटांत प्रवास होतो. आता ठाणे ते विमानतळ एक डेडिकेटेड कॉरिडॉर करण्यात येणार असून त्याचबरोबर मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या अर्थसंकल्पात देशात तीन कोटी घरे देण्याचे जाहीर केले असल्याने महाराष्ट्रात २० ते २५ लाख घरे नक्की बांधली जाणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना मुंबईत परत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहेत. त्याचबरोबर सिडको, एमएमआरडीएम, एमएसआरडीसी, महाप्रित, बीएमसी, म्हाडा, एसआरए या सर्व संस्थांना एकत्र करून रखडलेले प्रकल्प लवकर सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी जाहीर केले. समूह विकासच्या माध्यमातून सर्वांना खुली जागा, खेळाची मैदाने, शाळा, वैद्यकीय सुविधा मिळणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

CIDCO

WE MAKE CITIES



# १९,५१८ सर्वसामान्यांना मिळाले 'सिडको' या योजनेद्वारे हक्काचे घर

## सदनिकाधारकांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून अभिनंदन

◆ मुंबई (वार्ताहर) :

सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत, त्याचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहे. आजच्या या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी २१,३९९ सदनिकांच्या महासोडतीच्या माध्यमातून एकूण १९,५१८ नागरिकांचे सिडकोचे 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या योजनेद्वारे हे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असून त्यांच्या अभिनंदनाची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी व्यक्त केली. एका क्लिकवर उपमुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते १९,५१८ अर्जदारांचे हक्काच्या घराचे स्वप्न बुधवारी पूर्ण झाले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण येथे उपमुख्यमंत्री एकनाथ





शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाईन सोडत काढण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र यांनी व्हीडिओद्वारे दिलेला संदेश प्रसारित करण्यात आला. आपल्या संदेशामध्ये मुख्यमंत्री यांनी सिडकोची गृहनिर्माण योजना हे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकारणारे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले व यशस्वी अर्जदारांना शुभेच्छा दिल्या. तसेच नवी मुंबई हे भविष्यातील विकासाचे केंद्र असून सिडकोच्या योजनेमुळे सर्वसामान्य कुटुंबांना नवी मुंबईमध्ये हक्काचे घर मिळाले असल्याचे मुख्यमंत्री यांनी या संदेशाद्वारे सांगितले.

तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महासोडत कार्यक्रमासाठी दिलेल्या संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. मा. उपमुख्यमंत्री यांनी आपल्या संदेशामध्ये सदर महासोडत प्रक्रिया हे "सर्वांसाठी घरे" या संकल्पपूर्तीच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे असे प्रतिपादन केले व यशस्वी अर्जदारांना शुभेच्छा दिल्या.

त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी लॉटरी असून यात नागरिकांना आपली पसंद नोंदविण्याची मुभा फक्त सिडकोने दिली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

नवे शहर गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५

# १९,५१८ अर्जदारांचे स्वघराचे स्वप्न पूर्ण

## 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या लॉटरीची ऑनलाईन सोडत संपन्न

नवी मुंबई : सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत, त्याचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहे. आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी २१,३९९ सदनिकांच्या महासोडतीच्या माध्यमातून एकूण १९,५१८ नागरिकांचे 'सिडको'च्या 'माझ्या पसंतीचे सिडको घर' या योजनेद्वारे घरांचे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असल्याची भावना उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.



दरम्यान, एका क्लिकवर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या शुभहस्ते १९,५१८ अर्जदारांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले अहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या 'माझ्या पसंतीचे सिडको घरे' या लॉटरीची ऑनलाईन सोडत १९ फेब्रुवारी रोजी काढण्यात आली. याप्रसंगी 'सिडको'चे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सह-व्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, डॉ. राजा दयानिधी, गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, यांच्यासह 'सिडको'तील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या

(उर्वरित पान ५ वर)

### स्वघराचे...

(पान १ वरुन)

संख्येने उपस्थित होते.

'सिडको'च्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी लॉटरी असून यात नागरिकांना आपली पसंद नोंदविण्याची मुभा फक्त 'सिडको'ने दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घरे देण्याची घोषणा केली असून एवढ्या मोठ्या प्रमाणात घरे देण्याचा विक्रम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'सिडको'ची घरे टाटा, एल.ॲण्ड टी., शापूरजी यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती अतिशय दर्जेदार असून घरे रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार आहे. नवी मुंबईचे अतिशय वेगाने शहरीकरण होत असल्याने घरांची मागणी वाढली असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

पूर्वी नवी मुंबईतून मुंबईत येण्यासाठी एक ते दीड तास लागत असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, आता अटल सेतूमुळे २० मिनिटात प्रवास होतो. आता ठाणे ते विमानतळ असा डेडीकेटेड कॉरिडोर करण्यात येणार असून त्याचबरोबर मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो मार्गाने जोडली जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या अर्थसंकल्पात देशात ३ कोटी घरे देण्याचे जाहिर केले असल्याने महाराष्ट्रात २० ते २५ लाख घरे नक्की बांधली जाणार असल्याचा विश्वास ना. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना मुंबईत परत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहे. त्याचबरोबर सिडको, एमएमआरडीएम, एमएसआरडीसी, महाप्रित, बीएमसी, म्हाडा, एसआरए या सर्व संस्थांना एकत्र करुन रखडलेले प्रकल्प लवकर सुरू करण्यात येत असल्याचेही त्यांनी जाहिर केले. समुह विकास माध्यमातून सर्वांना खुली जागा, खेळाची मैदाने, शाळा, वैद्यकीय सुविधा मिळणार असल्याचे ना. शिंदे म्हणाले.

सदर सोडतीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओद्वारे दिलेला संदेश प्रसारित करण्यात आला. आपल्या संदेशामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सिडको'ची गृहनिर्माण योजना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकारणारे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले. तसेच नवी मुंबई भविष्यातील विकासाचे केंद्र असून 'सिडको'च्या योजनेमुळे सर्वसामान्य कुटुंबांना नवी मुंबईमध्ये हक्काचे घर मिळाले असल्याचे ना. फडणवीस यांनी संदेशाद्वारे सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महासोडत कार्यक्रमासाठी दिलेल्या संदेशाचेही यावेळी वाचन करण्यात आले. आपल्या संदेशामध्ये उपमुख्यमंत्री पवार यांनी सदर महासोडत प्रक्रिया 'सर्वांसाठी घरे' या संकल्पपूर्तीच्या दिशेने उचललेले महत्वाचे पाऊल आहे, असे प्रतिपादन केले. अनेक सर्वसामान्य कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होणे, आनंदाचा क्षण असल्याचे मत देखील त्यांनी या संदेशाद्वारे व्यक्त केले.

दरम्यान, काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी एमटीएचएल प्रकल्पास विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र, त्यावेळी रिमुव्हर्स सर्कुलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानांचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या कमी न होता आणखी वाढली. यावरुन शासन प्रो इन्व्हायर्नमेंट प्रकल्प करते आहे, ते दिसून आले. आता नवीन गृहनिर्माण धोरण आणली जात असून यात सर्वांसाठी परवडणारी घरे, परवडणारी भाड्याची घरे, विद्यार्थी वसतीगृहे, काम करणाऱ्या महिलांसाठी घरे, ज्येष्ठ नागरिकांना घरे, गिरणी कामगार, डबेवाले आदिंचा यात अंतर्भाव असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

मुंबई, गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

# ‘सिडको’च्या २१ हजार घरांसाठी सोडत जाहीर

**नवी मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

नवी मुंबईत ‘हक्काचे घर’ घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्याची प्रतीक्षा अखेर संपली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त ‘सिडको’कडून बुधवार, दि. १९ रोजी दुपारी २ वाजता २६ हजार, ५०२ घरांमधील २१ हजार, ३९९ घरांसाठी सोडत जाहीर करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ही सोडत काढण्यात आली.

शिवजयंतीच्या मुहुर्तावर ‘सिडको महामंडळा’च्यावतीने ‘माझे पसंतीचे सिडकोचे घर’ या गृहनिर्माण योजनेची संगणकीय महासोडत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली. या महासोडतीद्वारे २१ हजार, ३९९ लोकांचे गृहस्वप्नं पूर्ण करण्यात आले. यावेळी घर मिळालेल्या लाभार्थ्यांना तत्काळ घराची चावी सुपूर्द करण्यात आली. यावेळी ‘सिडको महामंडळा’चे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख तसेच ‘सिडको’चे सर्व प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी उपस्थित होते.

‘सिडको महामंडळा’च्यावतीने तयार करण्यात आलेल्या घरांचा दर्जा हा उत्तम आहे. नवी मुंबईतील नवीन विमानतळाच्या जवळपास असलेली ही घरे आहेत. या सोडतीद्वारे २१ हजार कुटुंबांचे स्वतःचे हक्काचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आनंद होत आहे. आज ज्यांना घरे मिळाली, त्यांचे अभिनंदन करतानाच ज्यांना घरे मिळाली नाहीत, त्यांच्यासाठी पुढील तीन आठवड्यांत पुन्हा नवीन सोडत काढण्यात येईल, असेही यावेळी शिंदेंनी सांगितले. मुंबईत जनसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी नवीन गृहनिर्माण धोरणात अनेक बदल करण्यात येणार आहेत. त्याद्वारे गिरणी कामगार, पोलीस, डबेवाले, मुंबईत काम करण्यासाठी येणाऱ्या महिला यांनाही भाडेतत्त्वावर घरे उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

CIDCO
WE MAKE CITIES

नवभारत टाइम्स । मुंबई । गुरुवार, 20 फरवरी 2025

# DCM शिंदे ने सिडको के किफायती 19,518 घरों की निकाली लॉटरी

## अब तक की सबसे बड़ी लॉटरी, बनाए गए हैं 21,399 घर

■ **NBT न्यूज़, नवी मुंबई:** आम जनता को किफायती घर उपलब्ध कराने के उद्देश्य से सिडको की 'मेरी पसंद का सिडको घर' योजना के तहत 21,399 घरों की लॉटरी निकाली गई। इनमें से 19,518 लोगों को घर मिल गए हैं। छत्रपति शिवाजी महाराज जयंती पर महाराष्ट्र के उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने ऑनलाइन लॉटरी निकाली।



बताया गया है कि सिडको के इतिहास की यह सबसे बड़ी लॉटरी है। यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान में आयोजित कार्यक्रम में शिंदे, सिडको के वरिष्ठ अधिकारी और अन्य मौजूद थे। महाराष्ट्र के मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने विडियो संदेश के जरिए घर पाने वालों को शुभकामनाएं दीं। उन्होंने कहा कि नवी मुंबई भविष्य का विकास केंद्र बन रहा है और सिडको की इस योजना ने हजारों लोगों का घर का सपना पूरा किया है। उप मुख्यमंत्री अजित पवार ने भी अपने संदेश में कहा कि 'सभी के लिए घर' के संकल्प की दिशा में उठाया गया यह कदम बेहद महत्वपूर्ण है। सिडको के इतिहास में यह पहली बार हुआ है, जब आवेदकों को अपनी पसंद के अनुसार घर चुनने का विकल्प दिया गया। टाटा, एल ऐंड टी, शापूरजी पल्लोनजी जैसी कंपनियों के सहयोग से ये घर तैयार किए गए हैं।

**लोगों को मिलेंगी कई सुविधाएं:** शिंदे ने कहा कि रेलवे स्टेशन, हवाई अड्डे और अन्य महत्वपूर्ण स्थानों के पास घर उपलब्ध कराए गए हैं, जिससे आम लोगों को सुविधा होगी। सरकार सभी के लिए किफायती घर, किराए के घर, छात्रावास, वृद्धाश्रम और कामकाजी महिलाओं के लिए विशेष घरों की योजना पर काम कर रही है। आवास और शहरी विकास के लिए महत्वपूर्ण कदम है। एमटीएचएल (मुंबई ट्रांस हार्बर लिंक) परियोजना से मुंबई और नवी मुंबई के बीच सफर मात्र 20 मिनट में होगा। मुंबई और नवी मुंबई एयरपोर्ट को मेट्रो से जोड़ा जाएगा। ठाणे से एयरपोर्ट के लिए डेडिकेटेड कॉरिडोर बनाया जाएगा।

www.freepressjournal.in Mumbai, Thursday, February 20, 2025

# Biggest-ever CIDCO lottery drawn: 19,518 proud homeowners

**Raina Assainar**
NAVI MUMBAI

The mega housing lottery, conducted by the City and Industrial Development Corporation (CIDCO), was drawn on Wednesday by Deputy Chief Minister Eknath Shinde. For 21,399 flats, 19,518 buyers have been chosen. A video message from Chief Minister Devendra Fadnavis was also played at the event.

The scheme, titled 'My Preferred CIDCO Home', was the largest-ever lottery in CIDCO's history. The draw was conducted on the occasion of Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti at Yashwantrao Chavan Pratishthan. Also present at the occasion were vice-chairman and managing director (MD) Vijay Singhal, deputy MDs and Panvel civic chief Mangesh Chitale.

At the event, Shinde said CIDCO is the only agency allowing applicants to choose their preferred homes, making the process more transparent and citizen-centric. He highlighted that the homes have been built by reputed developers such as Tata, L&T, and Shapoorji Pallonji, ensuring durability and high construction standards.

The strategic locations of these houses near railway stations and airports will offer great convenience to residents, he added.

Shinde highlighted ke
infrastructure development
that will further boost hous
ing demand in Navi Mumba
He noted that the travel tim
from Navi Mumbai t
Mumbai, which previousl
took over an hour, has nov
been reduced to just 20 mir
utes with the completion c
the Atal Setu (MTHL
Additionally, a dedicated cor
ridor from Thane to Mumba
airport is being developec
along with a Metro link con
necting Mumbai and Nav
Mumbai airports.

With the Union Budget'
provision to build three cror
houses across India
Maharashtra is set to con
tribute by constructin
between 20-25 lakh homes
Shinde announced. He addec
that new housing policies air
to bring back Mumbaikars
who have moved out due t
high property prices. T
accelerate housing develop
ment, stalled projects will b
revived through coordinatec
efforts by CIDCO, MMRDA
MSRDC, MahaPrith, BMC
MHADA, and SRA.

Shinde also announce
that the government wi
introduce a new housing pol
icy that will include afford
able housing for all incom
groups, rental homes, stu
dent hostels, housing fo
working women, homes fo
senior citizens, and housin
for mill workers and dabba
walas.

CIDCO
WE MAKE CITIES

Hindustan Times
MUMBAI
THURSDAY
FEBRUARY 20, 2025

## "My Preferred CIDCO Home" housing scheme will be conducted on February 19, 2025, by the auspicious hands of Hon'ble Deputy CM, Shri Eknath Shinde



On the auspicious occasion of Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti, the computerized mega lottery for the "My Preferred CIDCO Home" housing scheme will be conducted on February 19, 2025, by the auspicious hands of Hon'ble Deputy Chief Minister, Shri Eknath Shinde This will be Maharashtra's largest-ever computerized mega lottery for a housing scheme by CIDCO On the auspicious occasion of Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti, CIDCO is set to conduct Maharashtra's largest-ever computerized lottery draw for the "My Preferred CIDCO Home" housing scheme, comprising 21,399 homes. The event will take place on Wednesday, February 19, 2025, at 1:00 PM, by the auspicious hands Hon'ble Deputy Chief Minister, Shri Eknath Shinde. The computerized draw will be held at the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. Additionally, the lottery will be streamed live via webcasting, allowing applicants to witness the process from the comfort of their locations.

THE TIMES OF INDIA, MUMBAI/NAVI MUMBAI
THURSDAY, FEBRUARY 20, 2025

# 'Cidco flats to help bring citizens back to Mumbai'

**Umesh K Parida**



Dy CM Shinde said the Cidco housing scheme is the biggest in the state

**Navi Mumbai:** New housing schemes being introduced to bring back citizens who have left Mumbai, said deputy CM Eknath Shinde on the computerised lottery draw of 21,399 flats constructed by Cidco at the Yashwantrao Chavan Pratishthan on Wednesday.

The event coincided with the birth anniversary of Chhatrapati Shivaji Maharaj. The 'My Preferred Cidco Home' housing scheme is the biggest in the state for a housing scheme by Cidco.

Shinde had said that this is a record in providing houses in such a large number. These houses of Cidco are built with the participation of large business conglomerates like L&T are of good quality and close to railway stations and the airport benefiting the common people. He also said that the demand for houses in Navi Mumbai has increased due to rapid urbanization.

He outlined that Atal Setu has reduced the travel time from Mumbai to Navi Mumbai by 20 minutes while a dedicated corridor between Thane and the Navi Mumbai international airport, a metro line between Mumbai and the airport will further save the travel time between the cities.

Further, the flamingo numbers have increased in Navi Mumbai after commission of MTHL (Atal Setu) with use of remover circulation drain and noise barrier technologies.

The housing scheme under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) is for the Economically Weaker Sections (EWS) and Low-Income Groups (LIG) in Navi Mumbai's Vashi, Bamandongri, Kharghar, Kharghar East (Taloja), Mansarovar, Khandeshwar, Panvel, and Kalamboli nodes. The draw had a live streaming. The key feature of this scheme is that applicants have the freedom to choose their preferred home. Applicants can log in to their Cidco home account on the website to check the results from their homes.

THE TIMES OF INDIA, MUMBAI
THURSDAY, FEBRUARY 20, 2025

# 'Cidco housing scheme to bring back Mumbaikars'

**Navi Mumbai:** State deputy chief minister Eknath Shinde said that new housing schemes are being introduced to bring back Mumbaikars who have left the city. Shinde was speaking at an event at the Yashwantrao Chavan Pratishthan on the computerized lottery draw of 21,399 flats constructed by Cidco, on Wednesday. The event coincided with the birth anniversary of Chhatrapati Shivaji Maharaj. — **BB Nayak**

Newsband Thursday, 20 February 2025

# CIDCO cracks down on unauthorized construction in Sanpada

By Vikram Gaikwad

**Navi Mumbai:** The CIDCO anti-encroachment squad has intensified its crackdown on unauthorized constructions, demolishing a two-storey illegal structure in Sanpada Sector-5, Survey No. 66. The action, carried out over two days, resulted in the clearance of 900 square meters of land.




Despite prior warnings, construction on Plot Nos. 417, 417A, 418, and 419 continued illegally. Under the leadership of Chief Vigilance Officer Suresh Mengade, CIDCO's Unauthorized Construction Control Team took swift action, ensuring compliance with regulations.

The demolition was executed with support from CIDCO's Encroachment Department, police squad, and security personnel.